| | |
|---|---|
| | **जनसंपर्क अधिकारी**<br>**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**<br>**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**<br>**फोन नं ०२२-२९४५१००१**<br>Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in |


**प्रेसनोट क्रमांक :- २६३** **दिनांक :- २१/०९/२०२१**

# "वर्सोवा नाका येथे अवजड वाहनांना प्रवेश बंदीकरीता वाहतूक नियंत्रण अधिसुचना"

मिरा-भाईंदर शहरातील वर्सोवा नाका येथे जून्या खाडी पूलाच्या दुरुस्तीचे काम करण्यासाठी सदरच्या पूलाची एक लेन बॅरीकेटींग लावून दिनांक- २१/०९/२०२१ ते दिनांक- २५/०९/२०२१ रोजी पर्यंत सलग ५ दिवस बंद ठेवावी लागणार असल्याचे व पूलाच्या सुरक्षीततेच्या दृष्टीने पुलाचे दुरुस्तीचे काम तातडीने करणे गरजेचे असल्याचे आय.आर.बी. सुरत, दहीसर यांनी पत्राद्वारे कळविले आहे.

यामुळे सदरील पुलाचे कामासाठी ३ दिवस सलग पुलाची एक लेन बॅरीकेटींग लावून वाहनांसाठी बंद करण्यात येऊन केवळ एकच लेन वाहनांना मार्गस्थ होण्यासाठी शिल्लक राहणार असल्याने ठाणे व मुंबई बाजूकडून पालघर-गुजरात बाजूकडे जाणारी अवजड व हलकी वाहने एकाच वेळी एकाच लेनवरुन मार्गस्थ करावी लागल्यास मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी होणार होऊ शकते. ठाणे व मुंबईकडून मोठया प्रमाणात हजारो अवजड वाहने वर्सोवा जून्या खाडी पूलावरुन पालघर-गुजरात बाजूकडे मार्गस्थ होत असतात. यामुळे अवजड वाहनांना वर्सोवा पूलावरुन मार्गस्थ होऊ न देता दुस-या पर्यायी मार्गाने मार्गस्थ केल्यास बहुतांशी वाहनांची संख्या कमी होऊन वाहतूक कोंडी कमी होवू शकते. त्याकरिता श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), मिरा-भाईंदर वसई-विरार यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३३ (१)(ब) प्रमाणे व मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१)(अ)(ब) अन्वये पुढील प्रमाणे अधिसुचना जारी केल्या आहेत.

- राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वरील दहिसर ते सुरत दरम्यान असलेल्या वर्सोवा जून्या पुलाच्या दुरुस्तीकामी सदर पूलावरील दहीसर - सुरत मार्गावरील पहिली मार्गीका ३ दिवस बंद करण्यात येत आहे. सदरची मार्गीका बंद कालावधीत तिच्या लगत असणाया दुस-या मार्गिकेवरुन हलक्या वाहनांना वाहतूक करण्यास परवानगी देण्यात आली आहे.
- सदरच्या संपूर्ण कालावधीत जुन्या वर्सोवा पुलावरुन वाहतूक करण्याकरीता सर्व जड-अवजड वाहनांना मनाई करण्यात येत आहे. निराकेंद्र/गायमुख याठिकाणी गुजरात कडे जाणा-या जड अवजड वाहनांना वर्सोवा पुलाकडे जाण्यासाठी प्रवेश बंद करण्यात येत आहे. त्या वाहनांची वाहतूक खालील ३ पर्यायी मार्गांवर वळविण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग**

ठाणे शहर हद्दीतून वर्सोवा मार्गे पालघर बाजूकडे येणारी जड-अवजड वाहने.

अ) मुंब्रा- खारेगाव टोलनाका- मानकोली - भिवंडी - वाडा - मनोर – पालघर – मार्गे इच्छुक स्थळी जातील.

ब) मुंब्रा- खारेगाव टोलनाका- मानकोली- भिवंडी- नदी नाका- अंबाडी- वर्जेश्वरी- गणेशपूरी- शिरसाट फाटा मार्गे इच्छीत स्थळी जातील.

क) मुंब्रा- खारेगाव टोलनाका- मानकोली - अंजूर फाटा- कामण-चिंचोटी - वसई-विरार महानगरपालिका हद्द मार्गे इच्छीत स्थळी जातील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना ही **"महसूल विभागाची वाहने, पोलीस वाहने, अग्निशमन दलाची वाहने, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहने, पोलीस विभाग, तालुका दंडाधिकारी व भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, सुरत यांनी परवानगी दिलेली वाहने"** या वाहनांना लागू राहणार नाही. तसेच सदरची अधिसुचना दि. २६/०९/२०२१ ते दि. २८/०९/२०२१ या कालावधीत अंमलात असणार आहे.

----ooo----